Movie: Aai Thor Tujhe Upkaar
Year: 1999

Song: Aata Sangu Kasa
Lyricist: Jagdish Khebudkar

बाईचा पुतळा का पुतळ्याची बाई
हे बाईचा पुतळा का पुतळ्याची बाई
काय जादू झाली कळत न्हाई
अरे काय जादू झाली कळत न्हाई
मनात भरलं पिसं तुला सांगू कसं
माझ्या मनात भरलं पिसं
हे तुला सांगू कसं
ए माझं नाव पुतळा
न् तू लई बावळा
माझं नाव पुतळा
न् तू लई बावळा
राधेला भेटला किसन सावळा
राधेला भेटला किसन सावळा
रूप हे साजरं दिसं
आता सांगू कसं
सांग सांग
रूप हे साजरं दिसं
आता सांगू कसं

अगं रंभा मेनका उर्वशी वाटते फिकी
तू माझी सखी जलमभर होशील का
आ हा
अगं रंभा मेनका उर्वशी वाटते फिकी
तू माझी सखी जलमभर होशील का
अरे नाचेन मी छमछमा
रं नाच गं घुमा
म्हणून तू गाशील का
अरे नाचेन मी छमछमा
रं नाच गं घुमा
म्हणून तू गाशील का
नाच गं घुमा
कशी मी नाचू
ए नाच गं घुमा
नाचू मी कशी
अरं अंग अंग मुसमुसं
आता सांगू कसं
अगं सांग ना
अंग अंग मुसमुसं
आता सांगू कसं

आरं चाल माझी तुरूतुरू
लई नको झुरू
रातभर फिरू
नको तू भवतीनं
आरं चाल माझी तुरूतुरू
लई नको झुरू
रातभर फिरू
नको तू भवतीनं
अगं सात रंगी पाखरू
मिठीमधी धरू
का शिणगार करू
साजनी पिरतीनं
आसं का
हे सात रंगी पाखरू
मिठीमधी धरू
का शिणगार करू
साजनी पिरतीनं
चल जा

PlanetRead

Literacy for a Billion

साजनी गं
माझे साजनी गं हे
साजनी गं
माझे साजनी गं
अगं बोल असं का तसं
आता सांगू कसं हा
इश्श्
जरा बोल असं का तसं
तुला सांगू कसं
बाईचा पुतळा का पुतळ्याची बाई
बाईचा पुतळा का पुतळ्याची बाई
काय जादू झाली कळत न्हाई
ही काय जादू झाली कळत न्हाई
मनात भरलं पिसं

तुला सांगू कसं
माझ्या मनात भरलं पिसं
हे तुला सांगू कसं
ए माझं नाव पुतळा
न् तू लई बावळा
माझं नाव पुतळा
न् तू लई बावळा
राधेला भेटला किसन सावळा
राधेला भेटला किसन सावळा
रूप हे साजरं दिसं
आता सांगू कसं
सांग सांग
रूप हे साजरं दिसं
आता सांगू कसं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*